# नवी मुंबई महानगरपालिका
## महापालिका सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या गुरुवार, दिनांक 03/03/2016 रोजी भरलेल्या माहे मार्च महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01.**<br>**दिनांक 03 मार्च 2016**<br><br>**निर्णय -** | <br>प्रश्नोत्तरे<br><br>**मंजूर** |
| **विषय क्र. 02.**<br>**दिनांक 03 मार्च 2016**<br><br>**निर्णय -** | महानगरपालिकेचे दिनांक 20 जानेवारी 2016, 02 फेब्रुवारी 2016 भाग-I रोजीचे इतिवृत कायम करण्यात आले.<br><br>**इतिवृत कायम करण्यात आले** |
| **विषय क्र. 03.**<br>**दिनांक 03 मार्च 2016**<br><br>**ठराव क्र. 914.**<br>**दिनांक 03 मार्च 2016**<br><br>**निर्णय -** | **(अ)** महापालिका सचिव यांजकडून मा. महापौर यांस आलेले दिनांक 23/02/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/मस/276/2016 :-<br>**(ब)** वृक्षप्राधिकरण समितीवर एका जागेसाठी नामनिर्देशनाद्वारे उर्वरीत कालावधीसाठी सन्मा. सदस्याची नियुक्ती करणे.<br><br>**विषय क्र. 3(ब). (मार्च 2016)**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 10 जुलै 2015 रोजी भरलेल्या सर्वसाधारण तहकूब सभेचा ठराव क्रमांक 13 मध्ये अंशत: बदल करुन वृक्षप्राधिकरण समितीवर नेमलेल्या सन्मा. श्री. अनंत लक्ष्मण सुतार (नामनिर्देशित सदस्य) यांचे ऐवजी सदर पदावर सन्मा. सदस्य श्री. ---------------------------------------- यांची उर्वरित कालावधीकरिता नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येत आहे<br><br>**मागे घेतला.** |
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 03 मार्च 2016**<br><br>**ठराव क्र. 915.**<br>**दिनांक 03 मार्च 2016**<br><br>**निर्णय -** | नवी मुंबई महानगरपालिकेचा सन 2015-2016 चा सुधारीत आणि सन 2016-2017 चा अर्थसंकल्प "अ" आणि "क."<br><br>नवी मुंबई महानगरपालिकेचा सन 2016-2017 चा अर्थसंकल्प "अ" आणि "क" यावरील विचार तहकूब करण्यांत यावा आणि मा. महापौर निश्चित करतील त्या दिवशी भरणा-या महानगरपालिकेच्या विशेष सभेत विचारात घेण्यांत यावा."<br><br>**मंजूर** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचा सन 2015-2016 चा सुधारीत आणि सन 2016-2017 चा अर्थसंकल्प "ब." |
| **<u>ठराव क्र. 916.</u>**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचा सन 2016-2017 चा अर्थसंकल्प "ब" यावरील विचार तहकूब करण्यांत यावा आणि मा. महापौर निश्चित करतील त्या दिवशी भरणा-या महानगरपालिकेच्या विशेष सभेत विचारात घेण्यांत यावा." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 06.**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरणाचा सन 2015-2016 चा सुधारीत आणि सन 2016-2017 चा अर्थसंकल्प. |
| **<u>ठराव क्र. 917.</u>**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाचा सन 2016-2017 चा अर्थसंकल्प यावरील विचार तहकूब करण्यांत यावा आणि मा. महापौर निश्चित करतील त्या दिवशी भरणा-या महानगरपालिकेच्या विशेष सभेत विचारात घेण्यांत यावा." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 07.**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमणे /अनधिकृत बांधकामे, फेरीवाला इ.कार्यवाहीसाठी मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, साहित्य पुरवठा करणे व जप्त केलेल्या सामानाची वाहतूक करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 06/02/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/अति./286/2016. |
| **<u>ठराव क्र. 918.</u>**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे, फेरीवाला इ. कार्यवाहीसाठी मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, साहित्य पुरवठा करणे व जप्त केलेल्या सामानाची वाहतूक करण्याच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह प्रतीवर्ष रक्कम रु. 250 लाख, मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 08.**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | विद्युत/दुरसंचार/ नैसर्गिक वायु इत्यादीसाठीच्या सार्वत्रिक वापरासाठी दिलेल्या जागांचे भुई-भाडे आकारण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/02/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/231/2016. |
| **<u>ठराव क्र. 919.</u>**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | "विद्युत/दुरसंचार/नैसर्गिक इत्यादीसाठीच्या सार्वजनिक वापराकरिता महापालिकेच्या जागा वार्षिक भुईभाडे आकारुन "लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर" देण्यास आणि सद्यस्थितीत कार्यन्वीत प्राधिकरणाकडून पुर्वलक्षी प्रभावाने भाडे वसूल करण्यास व त्या अनुषंगाने संविदा करण्याकरिता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 09.**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | एकात्मिक विकास योजने अंतर्गत सेक्टर-15 सीबीडी येथे नविन दिवाबत्ती लावण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 22/02/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/सशअ/33/2016. |
| **<u>ठराव क्र. 920.</u>**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | "एकात्मिक विकास योजने अंतर्गत सेक्टर 15 सीबीडी येथे नवीन दिवाबत्ती लावण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 2 कोटी, 29 लाख, 82 हजार, 285 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 10.**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | ऐरोली सेक्टर-15, भुखंड क्र.22 ए येथे बांधण्यात आलेल्या ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर'' स्मारकाच्या डोमला मार्बल आच्छादन (Cladding) करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 23/02/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ/127/2016. |
| **<u>ठराव क्र. 921.</u>**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | "ऐरोली सेक्टर-15, भुखंड क्र. 22ए येथे बांधण्यात आलेल्या "डॉ. बाबासाहेब आंबेडकर" स्मारकाच्या डोमला मार्बल आच्छादन (Cladding) करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 19 कोटी, 32 लाख, 71 हजार, 424 मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार देय आलेल्या भाववाढीच्या रक्कमेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |
| **विषय क्र. 11.**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | वाशी सेक्टर-9अे येथील झुलेलाल मंदिरामागील कल्व्हर्टची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ/144/2016. |
| **<u>ठराव क्र. 922.</u>**<br>**दिनांक 03 मार्च 2016** | "वाशी सेक्टर-9अे येथील झुलेलाल मंदिरामागील कल्व्हर्टची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 49 लाख 54 हजार, 684 मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार देय आलेल्या भाववाढीच्या रक्कमेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी मा. आयुक्ताकडे पाठविलेल्या सन्मा. नगरसेवकांच्या ठरावांची यादी.

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 35 घणसोली वसाहतीला लागुन असणा-या मोठया नाल्यामध्ये असणारा गाळ काढणे व साफसफाई करणे. | 12 / मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 2. | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 35 ओमकार व श्री.गणेश सोसायटीला लागुन असणारे सर्कल छोटे करून विकसीत करणे तसेच चौकाला धर्मवीर राजे चौक असे नामकरण करून भव्य धर्मवीर संभाजीराजे यांचा पुतळा उभारणे. | 13 / मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 3. | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 35 भुखंड क्रमांक-6 या ठिकाणी मैदानाचे सपाटीकरण, भव्य व्यासपीठ तसेच चारही बाजुने भिंत, नवीन गेट बांधणे. | 14 / मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 4. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 49, "सेक्टर 12 डी, रामनगर सेक्टर 9 व सेक्टर 10 येथील अंतर्गत रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करणे. | 15 / मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 5. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 49, सेक्टर -9 व सेक्टर -10 येथे वाचनालय बनवून देणे | 16 / मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 6. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 49, सेक्टर -12 डी, रामनगर येथील तलावाचे सुशोभिकरण करणे. | 17 / मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 7. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96 मध्ये नेरुळ, सेक्टर -16 ए, सेक्टर-16 व 18 येथे एकही सुलभ शौचालय किवा मुतारी नाही त्यामुळे स्थानिक नागरिक, रिक्षावाले, व्यापारी व इतर कामगार वर्गाना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक नागरिक आणि व्यापारी वर्ग यांनी याबाबत मागणी केली आहे. तरी आपण प्रभागाचा सर्व्हे करुन आवश्यक त्या ठिकाणी सुलभ शौचालय किंवा ई - टॉयलेटची व्यवस्था करणे. | 18<br>मार्च | 923<br>03/03/2016 | मंजूर |
| 8. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96 मधील नेरुळ, सेक्टर -16 येथील संभाजीराजे उद्यानात सुंदर असे गजबो बसविणे. | 19<br>मार्च | 924<br>03/03/2016 | मंजूर |
| 9. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96 मधील नेरुळ, सेक्टर -16 ए, सेक्टर-16 व सेक्टर-18 मधील सर्व नामफलकांची सुधारणा करणे. | 20<br>मार्च | 925<br>03/03/2016 | मंजूर |
| 10. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 97 मध्ये ज्येष्ठ नागरिक, मध्यम वर्गीय नागरिक व लहान मुलांना वाचनाकरिता सदर विभागात वाचनालय नसल्यामुळे नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. तरी प्रभाग क्र.97 सेक्टर 18 मधील शहीद तुकाराम ओंबळे सभागृहामध्ये वाचनालय उभारणे. | 21<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 11. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 97 मध्ये पाम बीच रोडच्या आतील बाजूस असलेल्या सर्व्हीस रोडवर मोठया प्रमाणात अवजड वाहने उभी केलेली असतात त्यांच्यावर कारवाई करणे. | 22<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 12. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97 मध्ये सेक्टर 18 येथे धर्मवीर आनंद दिघे मैदानामध्ये ओपन जिम करणेबाबत जशी महानगरपालिकेच्या वतीने कै. आर. आर. पाटील मैदानामध्ये केली आहे, तशी करणे. | 23<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 13. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्रं. 28, घणसोली विभागातील महिलांसाठी महिला मंडळ व बचत गट यासाठी समाज मंदिरे बांधणे. | 24<br>मार्च | 926<br>03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 14. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्रं. 28, अंतर्गत सेक्टर 21 मध्ये आवश्यक तेथे हायमास्ट लावणे. | 25<br>मार्च | 927<br>03/03/2016 | मंजूर |
| 15. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्रं. 28, अंतर्गत सेक्टर 21 मध्ये औषध फवारणी करण्यात यावी. घणसोली विभागात प्रभाग क्रमांक 27 व 28 येथे दोन आरोग्यकेंद्र आहेत. त्यातील घणसोली आरोग्यकेंद्रातुन औषध फवारणी केली जाते म्हणून वाढती लोकसंख्या लक्षात घेता प्रभाग क्रमांक 27 व 28 मध्ये नौसिल नाका येथील आरोग्यकेंद्रातुन स्वतंत्र विभाग स्थापन करुन सेक्टर 21 व सभोवतालच्या परिसरात औषध फवारणी करणे. | 26<br>मार्च | 928<br>03/03/2016 | मंजूर |
| 16. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्रं. 27, अंतर्गत तळवली नाका येथील आंबेडकर चौक व आवश्यक ठिकाणी सी. सी. टि.व्ही. कॅमेरे बसविणे. | 27<br>मार्च | 929<br>03/03/2016 | मंजूर |
| 17. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्रं. 27, मध्ये तरुणांसाठी अदयावत व्यायाम शाळा बांधणे. | 28<br>मार्च | 930<br>03/03/2016 | मंजूर |
| 18. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्रं. 27, अंतर्गत तळवली नाका येथे लॅबरी व सुसज्य असे वाचनालय बांधणे. | 29<br>मार्च | 931<br>03/03/2016 | मंजूर |
| 19. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** "प्रभाग क्रं. 59 जुहूगांव -2, सेक्टर -11, वाशी, नवी मुंबई येथील गावदेवी मैदान येथील बंद असलेले सुलभ शौचालय तोडून तेथे व्यायामशाळा, वाचनालयासाठी बहुउद्देशीय इमारत बनविणे. | 30<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 20. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** "प्रभाग क्रं. 59 जुहूगांव -2, सेक्टर -11, वाशी, नवी मुंबई येथील गावदेवी मैदानात बसविण्यात आलेल्या बैठक स्टॅण्डची दुरुस्ती करुन त्यावर पत्र्याचे शेड बसविणे. | 31<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 21. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** "सिध्दीविनायक मंदिर ते मन्नूभाई चाळ पर्यत रस्ता बांधून डांबरीकरण करणे. | 32 / मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 22. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** बालीनगर ओमकृपा चाळ ते श्री अंबिका चाळ येथे गटारावर स्लॅब टाकणे. | 33 / मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 23. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** उत्तर भारतीय चाळ मुख्य रस्ता ते सदगुरुनगर, बालीनगर अंतर्गत पदपथाचे काँक्रीटीकरण करणे. | 34 / मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 24. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र 102, सेक्टर 3 विभागातील शाहीर अण्णाभाऊ साठे उदयान सेक्टर नं 1. या उदयानची दुरावस्था झाली आहे. सदर उदयानाची दुरुस्ती करुन सुशोभित करणे. | 35 / मार्च | 932 / 03/03/2016 | मंजूर |
| 25. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र 102, महाकाली चौक व एम.जी. एम. हॉस्पीटल समोरील भागात मोठया प्रमाणात नागरीकांची वर्दळ असल्याने सदर ठिकाणी ई - टॉयलेट बसवणे. | 36 / मार्च | 933 / 03/03/2016 | मंजूर |
| 26. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र 102, सेक्टर 9 विभागातील पदपथावरील झाडांना जुनी चौकड बनवण्यात आली आहे. ती तुटलेल्या अवस्थेत असुन त्याची दुरुस्ती करुन सुशोभीकरण करणे. | 37 / मार्च | 934 / 03/03/2016 | मंजूर |
| 27. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** "भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जगभरात 125 वी जयंती मोठया थाटामाटात उत्साहाने साजरी करण्यात येणार आहे. त्यामुळे आपल्या नवी मुंबई महानगरपालिके मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती साजरी करण्यासाठी आर्थिक तरतुद करणे. | 38 / मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **28.** | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 12 से.2 या ठिकाणी जे रस्ते आहेत त्या रस्त्याच्या बाजुने नागरीकांना व्यवस्थित चालता यावे यासाठी पर्यायी पादचारी फुटपाथ तयार करुन देणे. | 39<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **29.** | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 12 से. 1 मधील गणेश बाग सोसायटी मधील जे दोन धोकादायक रो-हाऊस आहेत. त्यांवर कार्यवाही करणेचा ठराव गेल्या महासभेत पास करण्यात आला होता. परंतु अद्याप त्या धोकादायक रो- हाऊसवर कार्यवाही झाली नाही. तरी सदर धोकादायक रो-हाऊसवर त्वरीत कार्यवाही करणे. | 40<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **30.** | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 29 घणसोली या प्रभागात म्हात्रेआळी, टेटर आळी, बौध्दवाडी, बाकारामवाडी, महादेववाडी, जयश्रीनगर, तीनबावडी, काफरीबाबानगर, अनंतनगर, प्रगतीनगर हि नगरे येत आहे. घणसोली विभाग कार्यालयाजवळ असलेल्या जलकुंभातून या भागाला पाणी पुरवठा केला जात आहे. पूर्वी या ठिकाणी बैठी घरे होती. परंतु आता ईमारती झाल्या आहेत त्याची संख्या हि वाढली आहे. व लोकसंख्येत वाढ झाली आहे त्यामुळे या जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा अपूरा पडत आहे. व येथील रहिवाशीयांची पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे व भविष्यात हि समस्या मोठी होणार आहे वाढणा-या इमारती व लोकसंख्या विचारात घेता या प्रभागात नविन भूमीगत व उच्चस्तरिय जलकुंभ बांधण्यात यावा जेणे करुन सध्या असलेली अपू-या पाणी पुरवठयाची समस्या व भविष्यात होणारी पाण्याची समस्या दुर करता येईल. | 41<br>मार्च | 935<br>03/03/2016 | मंजूर |
| **31.** | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई शहरात जागोजाग डेब्रीजचा राडारोडा टाकण्याची प्रवृत्ती बळावत असल्याने वाढणा-या बकालपणाला रोखण्यासाठी मुंबई महापालिकेने राबविलेल्या डेब्रिज ऑन कॉल पध्दतीचा अवलंब नवी मुंबई शहरात करण्यासाठी विभाग निहाय स्तरावर योग्य उपाययोजना करणे. | 42<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 32. | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेने समाजासाठी उभारलेले खुले मंच, वाचनालये, बहूद्येशीय इमारती अशा वास्तूची देखभाल दुरूस्ती वास्तूची सुरक्षा करणे महापालिकेला निधी अभावी शक्य होत नसल्याने त्या ठिकाणांची दुरावस्था झाल्याचे दिसून येते. त्यामुळे महापालिकेच्या नावाची चर्चा नकारात्मक विचारातून होते. म्हणून अशा वास्तू या शहरातील सेवाभावी संस्थांना त्याचा सामाजिक ध्येय, धोरण, उध्दीष्टांची, हेतूची पूर्तता करण्यासाठी बंधनकारक अटी शर्तीच्या तत्वावर त्या वास्तूंच्या देखभाल, दुरूस्तीच्या जबाबदारींसह देण्याबाबत योग्य उपाययोजना करणे. | 43<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 33. | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई शहरात बांधण्यात येणा-या नव्या तसेच पुर्नरचित इमारतींच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यापुर्वी सदरच्या कामातून निर्माण होणारे निरूपयोगी बांधकाम साहीत्याची विल्हेवाट लावण्याबाबत बांधकामधारक व्यक्ती, संस्था यांनी कोणत्या तरतूदी, उपायोजना केलेल्या आहेत याचा लिखित स्वरूपात तपशील बांधकाम प्रस्तावासोबत महापालिकेस सादर करणे बंधनकारक ठरविणे. | 44<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 34. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 108 अंतर्गत सिवुड्स सेक्टर-48 येथिल गणेश मैदानात हायमास्ट उभारणे. | 45<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 35. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 108 अंतर्गत सिवुड्स सेक्टर-48 मधील साईमहल सोसायटीचे हॅप्पी होम आणि साईबाबा मंदिर ते ओम गणेश सोसायटीचे फुटपाथ कमी करून बाजूने स्टीलचे पाईप्स बसविणे. | 46<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 36. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 108 अंतर्गत सिवुड्स सेक्टर-48 भुखंड क्रमांक 47 वर महापालिकेची व्यायाम शाळा उभारणे | 47<br>मार्च | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 37. | **श्री. घनश्याम मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 31 घणसोली मध्ये plot No.22 सेक्टर- 8 येथे तमाशा थियटर साठी राखीव ठेवलेल्या भुखंडावर लवकरात लवकर थिअटरचे काम सुरू करणे. | 48<br>मार्च | 936<br>03/03/2016 | मंजूर |
| 38. | **सौ. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.106 मधील असलेल्या, बेलापूरगांव, शहाबाज, फणसपाडा येथे प्रवेशव्दार बांधणे. | 49<br>मार्च | 937<br>03/03/2016 | मंजूर |
| 39. | **सौ. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.106 मधील शहाबाज व फणसपाडा येथील उघडा नाला बंदिस्त करणे. | 50<br>मार्च | 938<br>03/03/2016 | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**